सूचनापत्र

जाहिरात क्र.ससंलेवको/सरळसेवा भरती/क.ले./को.वि./२०२४, दि.३०.०१.२०२५ चे अनुषंगाने उत्तर तालिका (Answer key) व हरकत अर्जाबाबत सूचना.

सहसंचालक लेखा व कोषागारे, कोकण विभाग, नवी मुंबई च्या आस्थापनेवरील गट-क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी वर्तमानपत्रात **क्र.ससंलेवको/सरळसेवा भरती/क.ले./को.वि./२०२४, दि.३०.०१.२०२५ अन्वये** प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार अर्ज केलेल्या अर्हताधारक उमेदवारांची ऑनलाईन परिक्षा दि.०५.०५.२०२५ ते ०७.०५.२०२५ रोजी एकूण सहा शिफ्टमध्ये घेण्यात आलेली आहे.

कनिष्ठ लेखापाल या पदांच्या उत्तर तालिकेची लिंक (Answer key Link) https://mahakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर Careers या मेन्यूमध्ये दि. २७.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपासून ते दिनांक ३०.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे. उमेदवारांनी वरीलप्रमाणे लिंकवर अर्ज क्रमांक (Application No.) व ऑनलाईन अर्ज भरतेवेळी वापरलेला पासवर्ड (Password) वापरुन उत्तरतालिका (Answer key) तपासून घ्यावी तसेच (Objection Form) live करण्यात येत आहे.

कनिष्ठ लेखापाल या पदांच्या ऑनलाईन परिक्षेचे प्रश्न अथवा उत्तराबाबत उमेदवारांच्या हरकती/आक्षेप असल्यास दि. २७.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपासून ते दि.३०.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत योग्य त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह उत्तरतालिकेसोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या हरकत अर्जात पाठविण्यात याव्यात. प्रत्येकी एका हरकत/आक्षेपाकरीता रु. १०० शुल्क आकारण्यात येत आहेत. सदरचे शुल्क उमेदवाराने UPI, इंटरनेट बँकीग, क्रेडीट कार्ड किंवा डेबीट कार्डद्वारे भरावे. विहित मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती/आक्षेप यांची दखल घेतली जाणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(वंदना जोशी)
सहसंचालक,
लेखा व कोषागारे, कोंकण विभाग,
कोंकण भवन,नवी मुंबई.